

## मी ‘दुर्गाबाई देशमुख’ बोलतेय!

माझं नाव दुर्गा… दुर्गाबाई देशमुख. माझा जन्म १५ जुलै १९०९ रोजी आंध्र प्रदेशातील राजमुंद्री येथे झाला. पण माझ्या आयुष्याची खरी सुरुवात झाली ती एका छोट्याशा प्रसंगातून…

साल होतं १९२३. काकीनाडा येथे राष्ट्रीय काँग्रेसचं अधिवेशन भरलं होतं. मी फक्त १४ वर्षांची. प्रवेशद्वारावर स्वयंसेवक म्हणून उभी होते. माझ्या हातात एकच जबाबदारी होती – “तिकीट पाहिल्याशिवाय कोणालाही आत सोडायचं नाही.” तेवढ्यात एक उंच, देखणा नेता आत जाण्यास निघाला. मी त्यांना थांबवलं. तिकीट मागितलं. त्यांच्याकडे नव्हतं. मी त्यांना थांबवलंच. आयोजक धावत आले – “ओळखत नाहीस का? हे जवाहरलाल नेहरू आहेत!”

मी शांतपणे उत्तर दिलं – “ओळखते. पण तिकीटाशिवाय प्रवेश नाही.”

नंतर पंडित जवाहरलाल नेहरूंनीच माझं कौतुक केलं. त्या दिवशी मला समजलं – कर्तव्य मोठं की व्यक्ती? माझ्यासाठी कर्तव्यच मोठं होतं.

मी लहानपणीच सामाजिक बंधनांचा अनुभव घेतला. केवळ ८ व्या वर्षी माझं लग्न लावून देण्यात आलं. पण १५ व्या वर्षी मला जाणवलं – माझं आयुष्य केवळ चार भिंतींसाठी नाही. मी घरच्यांना सांगितलं, “मी चांगली पत्नी होऊ शकणार नाही. मला समाजासाठी काम करायचं आहे.” आणि मी त्या नात्यातून मुक्त झाले. पुढे माझ्या पहिल्या पतीच्या निधनानंतर त्यांच्या पत्नीला मी आधार दिला – कारण माझ्यासाठी माणुसकी सर्वात मोठी होती.

महात्मा गांधींच्या असहकार चळवळीचा माझ्यावर खोल परिणाम झाला. पाचवीत असताना मी शाळा सोडली – कारण पुढे इंग्रजी शिकावं लागणार होतं. मी खादी परिधान केली. स्वदेशी स्वीकारलं.

१२ व्या वर्षी मी देवदासी प्रथेच्या विरोधात उभी राहिले. त्या महिलांचं शोषण मला अस्वस्थ करत होतं. गांधीजी आमच्या भागात येणार असल्याचं कळलं. मी देवदासी आणि मुस्लिम महिलांची त्यांच्याशी भेट घडवून आणायचं ठरवलं. आयोजकांनी अट घातली – “पाच हजार रुपये जमा कर.” आम्ही २५ हजार रुपये आणि

दागिने गोळा केले! गांधीजी दोन मिनिटांसाठी आले होते; पण अर्धा तास थांबले. त्यांचं भाषण मी तेलगूत अनुवादित केलं. पुढे दक्षिण भारतात जेव्हा जेव्हा ते आले, तेव्हा मी त्यांची दुभाषी झाले.

तुरुंगवास माझ्यासाठी नवा नव्हता. मी मीठ सत्याग्रहात भाग घेतला आणि १९३० ते १९३३ तीन वर्षे तुरुंगात राहिले. एक वर्ष एकांतवासही भोगला. तुरुंगात कैद्यांच्या 'अ', 'ब', 'क' अशा वर्गवारीत मला विशेष सवलती नको होत्या. मी 'क' वर्ग मागितला – कारण मला सामान्य स्त्रियांची वेदना समजून घ्यायची होती.

तुरुंगातून बाहेर पडल्यावर मी ठरवलं – वकील व्हायचं. त्या वेळी मी फक्त पाचवी शिकलेली मुलगी होते. इंग्रजीही येत नव्हतं. पण मी हार मानली नाही. शिक्षण पूर्ण केलं. एल.एल.बी. झाल्यावर मद्रासमध्ये वकिली सुरू केली. महिलांसाठी 'आंध्र महिला सभा' स्थापन केली.

वयाच्या ३७ व्या वर्षी मी संविधानसभेत निवडून आले. सुमारे ७५० दुरुस्त्या सुचवल्या. भाषा, न्यायव्यवस्था, धर्मस्वातंत्र्य, महिलांचे अधिकार – या विषयांवर मी ठामपणे मांडणी केली. हिंदू कोड बिलाची मी कट्टर समर्थक होते – कारण मुलींनाही संपत्तीत समान हक्क हवा होता.

माझ्या कामाचे एक प्रशंसक होते – चिंतामण द्वारकानाथ देशमुख, भारताचे पहिले भारतीय रिझर्व बँक गव्हर्नर आणि नंतर अर्थमंत्री. आमचं नातं परस्पर आदरावर उभं राहिलं. १९५३ मध्ये आम्ही साध्या पद्धतीने विवाह केला. पंडित नेहरू साक्षीदार होते. आम्ही एक करार केला – दोघेही सरकारी पदावर असू, तर एकाने पगार घेऊ नये. देशमुख फक्त एक रुपया मानधन घेत असत.

पुढे मी केंद्रीय समाज कल्याण मंडळाची जबाबदारी सांभाळली. स्त्रियांच्या, वंचितांच्या उन्नतीसाठी आयुष्य झोकून दिलं. म्हणूनच कदाचित मला "भारताची मदर ऑफ सोशल वर्क" म्हणतात.

९ मे १९८१ रोजी मी या जगाचा निरोप घेतला. पण माझा विश्वास आजही जिवंत आहे – *"स्त्री सक्षम झाली, तर समाज सक्षम होतो. न्याय आणि निष्ठा यांच्यावर उभा राहिलेला देशच खरा स्वतंत्र असतो."*